# -प्रेस नोट-

सन २००३ ते २००५ या कालावधीत आधुनिक गृहनिर्माण वित्तीय कॉर्पोरेशन लि. या कंपनीने महाराष्ट्रामध्ये सिंधुदूर्ग, रत्नागीरी, रायगड, ठाणे, पुणे ग्रा., नवी मुंबई व सातारा जिल्हयांमध्ये विवीध शाखा सुरु केल्या. गुंतवणूकदारांना प्रचलीत कालावधीपेक्षा कमी कालावधीत व प्रचलीत व्याजदरापेक्षा अधिक व्याजदराचे, आकर्षक योजनांचे अमिष दाखवुन प्रलोभन दाखवले व त्यांचेकडुन गुंतवणूक रक्कम स्विकारुन मुदतीनंतर गुंतवणूक रक्कम परत न करता एकुण ४१,२९६ गुंतवणूकदारांची रुपये ११,१७,११, ८९१ /- ची फसवणुक केलेबाबत वेगवेगळया पोलीस स्टेशनला २३ गुन्हे दाखल आहेत. नमूद गुन्हयांचा तपास गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे कडुन करण्यात येत आहे.

नमूद गुन्हयांमध्ये प्रकाश बाबुराव गोवळकर रा. प्लॉट नं. ३२, नंदनवन कॉलनी, नागपूर हा गुन्हे दाखल झाले पासुन मिळुन येत नव्हता. अटक टाळण्यासाठी, तो वास्तव्याचे ठिकाणापासुन इतरत्र लपुन राहीला होता. त्यांचा वारंवार शोध घेऊनही त्याचा ठावठिकाणा मिळुन आला नाही. त्यास जिल्हा सत्र न्यायालय, अलिबाग, जि. रायगड न्यायालयाने दिनांक ०७/११/२०१३ रोजी फरार घोषित केले होते.

गुन्हे अन्वेषण विभागाकडुन फरार/पाहिजे आरोपींचे शोध व अटकेसाठी राबविण्यात येत असलेल्या मोहिमे अंतर्गत भरारी पथकातील श्री. सतिश गोवेकर, अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. बी.आर. पुल्ली, पो.नि. श्री. वाय.जी. निकम, पो.हवा. देसाई, पो.हवा. दोरगे, पो.हवा. जोशी, पो.हवा. भापकर यांनी प्रकाश गोवळकर याची गोपनियरित्या बारकाईने माहिती संकलीत करुन त्याचे विश्लेषण केले व सदर माहितीच्या आधारे त्याचा शोध घेतला असता तो वर्धा, नागपूर शहराचे परिसरात वास्तव्यास असलेबाबतची खात्रीलायक माहिती मिळाली.

सदर ठिकाणी उपरोक्त अधिकारी व कर्मचारी यांनी वर्धा येथे दिनांक २२/०१/२०१८ पासुन सतत वास्तव्य करुन नमूद पाहिजे आरोपीची हालचालींबाबत गोपनिय माहिती मिळविली. दिनांक ०५/०२/२०१८ रोजी तो हिंगणघाट येथे मोटा बागेच्या मागील बाजुस आला असल्याची गोपनिय माहिती मिळाल्याने त्या ठिकाणी जाऊन त्यास ताब्यात घेण्यात आले आहे. त्यास दाखल गुन्हयांमध्ये अटक करुन अधिक तपास करण्यात येत आहे.

उपरोक्त पथकाने गेले दोन महिन्याचे कालावधीत गु.अ.वि., म.रा., पुणे कडील गुन्हयांमध्ये फरार/पाहिजे असलेले ५ आरोपींना अटक करण्यामध्ये यश मिळविले आहे.

---ooo---